दि. 02/08/2019

प्रेस नोट

स्मार्ट नाशिकसाठी स्मार्ट पार्किंग

नाशिक स्मार्ट होताना शहरातील सोयी सुविधांवरही भर देण्यात येत आहे. शहरातील वाहतुकीला शिस्त लागावी, वाहतूक कोंडी होऊ नये आणि जास्तीत जास्त नागरिकांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यात यावा यासाठी स्मार्ट पार्किंगचा विचार करण्यात आला. स्मार्ट पार्किंगचा विचार करताना सर्वात आधी सर्व आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या. तसेच पोलीस उपायुक्तांकडूनही ग्रीन सिग्नल मिळाल्यानंतर नाशिक शहरातील स्मार्ट पार्किंगने वेग घेतला आहे.

स्मार्ट पार्किंग प्रकल्पाचे काम सुरू करण्यापूर्वी शहरातील 33 ठिकाणांचा अभ्यास करण्यात आला. त्यातील 28 ठिकाणी ऑन स्ट्रीट पार्किंग असणार आहे. आणि 5 ठिकाणी ऑफ स्ट्रीट पार्किंग व्यवस्था असणार आहे. सध्या 15 ठिकाणी प्रायोगीक तत्त्वावर स्मार्ट पार्किंग व्यवस्था राबवण्यात येत आहे. त्यामुळे सध्या तरी तारीख ठरेपर्यंत पार्किंग व्यवस्था मोफत असणार आहे. आणि तारीख ठरल्यानंतर स्मार्ट पार्किंगचे शुल्क 5 रुपये दुचाकीसाठी प्रतितास आणि 10 रुपये चारचाकी गाडीसाठी प्रतितास असे महापालिकेच्या ठरावानुसार आकारण्यात येणार आहे.

स्मार्ट पार्किंगचा आराखडा बनवताना वर्दळीच्या ठिकाणी, पीक अवर्समध्ये होणारी गर्दी आणि ना फेरिवाला क्षेत्र या सर्वांचा अभ्यास करूनच आराखडा बनवण्यात आला. सध्या शहरात 15 ठिकाणी स्मार्ट पार्किंग राबविली जात आहे. त्यात 13 ठिकाणी ऑन स्ट्रीट व 2 ठिकाणी ऑफ स्ट्रीट स्मार्ट पार्किंग असणार आहे.

कुलकर्णी गार्डन ते साधू वासवानी रोड येथे दोन्ही बाजूस स्मार्ट पार्किंग सध्या प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येत आहे. या ठिकाणी पहिल्यापासूनच पार्किंग व्यवस्था आहे. त्याला स्मार्ट पार्किंगचे रुप देण्यात येत आहे. कुलकर्णी गार्डन ते बीएसएनएल ऑफिस या मार्गावर उजव्या बाजुला म्हणजे बीएसएनएलच्या भिंतीला लागून स्मार्ट पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. यामार्गावर कोणत्याही प्रकारचा हॉकर्स झोन नाही. गुरूजी हॉस्पिटल ते पाइपलाइन रोड या मार्गावर ना फेरीवाला क्षेत्र आहे तशा प्रकारचा सूचना फलकही तेथे आधीपासूनच आहे. शालीमार ते नेहरू गार्डन या मार्गावरही ना फेरीवाला क्षेत्र असून तशाप्रकारचे फलक तेथे आधीपासूनच आहेत. सोमानी गार्डन ते मुक्तीधाम हॉकर्स झोन नसलेल्या ठिकाणी स्मार्ट पार्किंग प्रस्तावित आहे. रामवाडी पूल येथे स्मार्ट पार्किंग प्रस्तावितच नाही. मात्र, तेथे ना फेरीवाला क्षेत्र असे फलक लावण्यात आलेले आहेत. या व्यतिरिक्त स्मार्ट पार्किंगसाठी निवडण्यात आलेल्या जागांवर कोणत्याही प्रकारचे हॉकर्स झोन नव्हते आणि असतील तर तेथील हॉकर्सना नोटीस देऊन व्यवसायासाठी दुसरी जागा देण्यात आली आहे. तसेच सर्व गोष्टींची शहानिशा करूनच स्मार्ट पार्किंगची ठिकाणं ठरवण्यात आलेली आहेत. त्यात कोणत्याही प्रकारे कुणालाही त्रास होणार नाही याची खबरदारी

घेण्यात आली आहे आणि यापुढेही खबरदारी घेण्यात येईल. सध्या 15 ठिकाणी स्मार्ट पार्किंग प्रायोगिक तत्त्वावर निःशुल्क राबवण्यात येत आहे.

(जनसंपर्क विभाग- स्मार्ट सिटी नाशिक)